दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १८४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२९ सप्टेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

खोपोलीच्या झेनिथ धबधब्यात तीन जण गेले वाहून

दोन महिलांचे मृतदेह मिळाले ; आठ वर्षांची चिमुकली अद्याप बेपत्ता

दै.रायगड नगरी । राज साळुंके

खोपोली : प्रसिद्ध पर्यटन स्थळ अशी ओळख असलेल्या झेनिथ वॉटर फॉल नेहमीच काही न काही कारणांनी चर्चेत राहिला आहे. सतत सुरू असलेल्या पावसाने वाटरफॉल पर्यटकांना आकर्षित करत आहेत.

आज दि २८ रोजी पर्यटकांचा एक समूह झेनिथ वॉटर फॉल येथे पर्यटनासाठी गेला होता ज्यामध्ये दोन पुरुष, पाच महिला व आठ लहान मुलांचा समावेश होता. पावसाचा जोर अचानक वाढल्याने वाटरफॉलच्या पाण्याचा प्रवाह वाढत गेला त्यातच प्रवाहाचा अंदाज न आल्याने आठ वर्षीय आलंमा खान वाहून गेली आहे. तिला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना मेहरबानू खान (वय वर्ष ४०)

आणि रुबिना वेळेवर (वय वर्ष ४०) वाहून गेल्या. शहरातील अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेच्या सदस्यांनी तातडीने संबंधित ठिकाणी धाव घेत बचावकार्य सुरू केले होते. त्या दरम्यान दोन्ही महिलांचा मृतदेह बाहेर काढण्यात रेस्क्यू टीमला यश आले असून आठ वर्षीय आलमा खान मात्र अद्याप बेपत्ता असल्याचे समजते.

रेस्क्यू टीम मार्फत इतर सर्व पर्यटकांना त्या ठिकाणाहून दोरीच्या सहाय्याने सुखरूप बाहेर काढले असून अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठीच्या टीम मार्फत मुलीचा शोध नदीपात्रात सुरू असताना एकंदरीत पाण्याचा प्रवाह पाहता व अंधारामुळे अडचणी येत असल्याने शोध मोहीम थांबवण्यात आली असून सकाळी पुन्हा शोध मोहीम सुरू करणार असल्याचे गुरुनाथ साठेलकर यांनी संगितले आहे.

पेणमध्ये भाजपला खिंडार ; शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार ठरविणार पेणचा आमदार : खा.सुनील तटकरे

दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल

आज पेणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा आणि कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश कार्यक्रम रायगड जिल्ह्याचे खासदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुनिल तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आगरी समाज हॉल येथे पार पडला.

गेले काही महीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद जिल्ह्यामध्ये वाढत आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आणि गावांत खासदार सुनिल तटकरे हे भाजप आणि शिवसेनेला मोठे राजकीय धक्क्यांवर धक्के देत आहेत. आज पेण तालुक्यातही याची झलक पहायला मिळाली. आज पेणमध्ये भाजपच्या काही जेष्ठ पदाधिकाऱ्यांनी स्थानिक आमदार आणि नेते यांच्या कार्यपद्धतीवर टिका करत भाजपच्या असंख्य कार्यकर्त्यांसोबत राष्ट्रवादित प्रवेश केला.

खासदार सुनील तटकरे यांनी आज जाहीर सभेत सांगितले की, पेण तालुक्याच्या सर्वांगीण विकासामध्ये आपला कोणताही राजकीय हेतू नसून तटकरे कुटुंबातील कोणतीही व्यक्ती पेण मतदार संघाची आमदार पदाची निवडणूक लढणार नसून राष्टवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार जो उमेदवार ठरवतील तोच उमेदवार या पेण विधानसभा मतदार संघाचा आमदार असेल असे जाहीर केले. राष्टवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्यांचा यथोचित सत्कार आणि सन्मान ठेवला जातो असे सांगून गंगाधर पाटील यांना रायगड जिल्हा सरचिटणीस आणि ऍड विकास म्हात्रे यांना रायगड जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली असल्याचे जाहिर केले.

यावेळी प्रामुख्याने शेकापचे नेते अनंत ढेणे, शेकापचे जेष्ठ नेते प्रभाकर लांगी, कोप्रोली ग्रामपंचायतीचे सरपंच विकास पाटील, उर्नोली ग्रामपंचायतीचे सरपंच प्रतिभा पाटील, तरणखोप ग्रामपंचायत सरपंच अभिजित पाटील, हमरापूर ग्रामपंचायत सरपंच प्रदीप म्हात्रे, भाजपचे ऍड विकास म्हात्रे यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तसेच भारतीय जनता पक्ष पेण तालुक्यामध्ये गेली ३० वर्ष कार्य करणारे आणि माजी तालुका अध्यक्ष गंगाधर पाटील

...//२

संक्षिप्त...

मुश्रीफांची बदनामी थांबवण्यासाठी न्यायालयाकडून मनाई आदेश

कोल्हापूर : वृत्तसंस्था

घोटाळ्याचे खोटे, निराधार आरोप करत बदनामी केल्याचा दावा करत अब्रुनुकसान भरपाई द्यावी म्हणून राष्ट्रवादीचे नेते आणि ग्रामविकास मंत्री यांच्याकडून भाजपचे नेते किरीट सोमय्या यांच्यावर १०० कोटी रुपयांचा दावा न्यायालयात दाखल करण्यात आला. त्यानंतर किरीट सोमय्या आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मुश्रीफांची बदनामी थांबवावी म्हणून न्यायालयाने मनाई आदेश दिला, पण याबाबतची नोटीस स्वीकारण्यास दोघांनी आज नकार दिला आहे.

मुश्रीफांनी सोमवारी सोमय्या यांच्यावर शंभर कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला. सहावे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश पी. आर. राणे यांच्यासमोर त्याची सुनावणी झाली. आपली बदनामी थांबवावी यासाठी सोमय्या यांच्याबरोबरच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना मनाई आदेश द्यावा, अशी विनंती न्यायालयाला केली. त्यानुसार न्यायालयाने या दोघांनाही मनाई आदेश काढला. सोमय्या आज कोल्हापूर दौऱ्यावर होते. त्यांनी याबाबतीत काढलेली नोटीस घेण्यास नकार दिला. चंद्रकांत पाटील यांनीही ती नोटीस स्वीकारली नाही. मुश्रीफ यांच्यावतीने ॲड. प्रशांत चिटणीस काम पाहत आहेत. या दोन्ही नेत्यांनी न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केल्याने एकतर्फी सुनावणी घ्यावी, अशी विनंती आपण करणार असल्याचे ॲड. चिटणीस यांनी सांगितलं.

जासई येथे हातचलाखीने एटीएम बदलून खात्यातून केले लाखो रुपये लंपास

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : एटीएम सेंटर मध्ये उभ्या असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने हात चलाखी करून एका व्यक्तीचे एटीएम कार्ड बदलून तब्बल १ लाख ८ हजार रूपये लंपास केल्याची घटना उरण तालुक्यातील जासई येथे घडली आहे. या प्रकरणी उरण पोलिस ठाण्यात अनोळखी व्यक्ती विरोधात चोरी आणि फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव ओमप्रकाश संतराज निशाद आहे.ते २१ तारखेला जासई गावाजवळील एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी आपल्या मित्रासमवेत आले होते. हे दोघे एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता तेथे दुसऱ्या एटीएम मध्ये एक अनोळखी इसम पैसे काढत होता. निशाद यांनी एकवेळा या एटीएममधुन १० हजार रूपये काढले. मात्र त्याच वेळी त्यांना फोन आल्याने ते एटीएम घेवून बाहेर आले आणि आपल्या मित्र गणेश सहानी याला एटीएम मधून रक्कम काढण्यास सांगितले.

गणेश हा एटीएममध्ये कार्ड टाकून पिन विचारण्यासाठी बाहेर आला त्यावेळी या अनोळखी व्यक्तीने त्याचे कार्ड बदलले आणि निशादने गणेशला सांगितलेला पिन चोरून ऐकला. काही वेळाने त्यांच्या खात्यातून तब्बल १ लाख ८ हजार रूपये

...//२

शिवभोजन थाळी मोफत देण्याचा निर्णय रद्द

१ ऑक्टोबरपासून शिवभोजन थाळी पूर्वीप्रमाणे १० रूपयाला

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यात कोरोनाचे आकडे कमी होत असताना आता राज्यात सुरु असलेल्या ब्रेक द चेन या प्रक्रियेअंतर्गत टप्प्याटप्प्याने निर्बंध शिथील करण्यात आले आहे. दरम्यान मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील विविध समाजघटकांसाठी मदतीचे जे पॅकेज घोषित केले होते त्यामध्ये राज्यातील गरीब आणि गरजू लोकांना १५ एप्रिल पासून पुढे एक महिन्यासाठी शिवभोजन थाळी अंतर्गत मोफत जेवणाची व्यवस्था उपलब्ध करून दिली होती. मात्र आता राज्यातील कोरोनाची परिस्थिती अटोक्यात आल्याने राज्य सरकारने शिवभोजन थाळी मोफत देण्याचा निर्णय रद्द केला आहे. १ ऑक्टोबरपासून शिवभोजन थाळी पुन्हा १० रुपयांना मिळणार आहे.

कोरोना काळात मजुर, कामगार, शेतकरी वर्गासह सर्वसामान्य जनतेला शिवभोजन थाळी मोठा आधार देत होते. कोरोनामुळे लाभार्थ्यांना ही थाळी मोफत दिली जात होती. ३० सप्टेंबरपर्यंत थाळी मोफत असेल नंतर त्याचे दर १० रुपये असे पूर्वीप्रमाणे करण्याचा शासनादेश आज जारी करण्यात आला आहे. तसेच पार्सल सुविधाही बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रेक द चेन प्रक्रियेअंतर्गत राज्यात कडक निर्बंध लागू करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर शिवभोजन थाळीच्या राज्याच्या प्रतिदिन इष्टांकामध्येही दीडपट वाढ करण्यात आली होती.

राज्यातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी ब्रेक द चेन प्रक्रिया संपूर्ण राज्यभर राबविली जात आहे. या काळात राज्यातील गोरगरीब जनतेचे हाल होऊ नयेत याची काळजी शासनाने घेतली आहे. राज्यात दिनांक १५ एप्रिल २०२१ पासून शिवभोजन योजनेअंतर्गत नि:शुल्क थाळी उपलब्ध करून दिली जात आहे. १५ एप्रिल २०२१ ते २० मे २०२१ पर्यंत ४८ लाख ४४ हजार ७०९ नागरिकांनी मोफत शिवभोजन थाळीचा लाभ घेतला आहे. या अडचणीच्या काळात मोफत शिवभोजन थाळीने राज्यातील गरीब जनतेला मोठा दिलासा दिला आहे.

भरधाव ट्रेलरची दुचाकीला धडक ; दुचाकीस्वार जागीच ठार

दै.रायगड नगरी । विश्वास निकम

गोवे-कोलाड : मुंबई गोवा महामार्गाला जोडला गेलेला कोलाड सुतारवाडी महामार्गावर अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना घडली असून भरधाव ट्रेलरने एका दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिल्याने यात दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना सुतारवाडी येथील ढोकलेवाडी नजीक घडली आहे मालवाहू ट्रक ट्रेलरचा चालक फरार झाल्याने सदर घडलेल्या घटनेमुळे सर्वत्र हाहाकार माजला आहे.

सदर याबाबत कोलाड पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कोलाड कडून सुतारवाडीकडे भरधाव जाणारा ट्रेलर क्रमांक एम एच ०४८ए जी ५३७० तर सुतारवाडी कडून येणारी दुचाकी वाहन क्रमांक एम एच ०६ ए व्ही २५३९ चालक मंगेश प्रकाश हिलम रा. निळज माणगाव वय (२०) सुतारवाडी कडून कोलाडच्या दिशेने येत असतांना ढोकळेवाडी येथील वळणावर ट्रेलर चालकाने दुचाकीस्वार मंगेश हिलम यांच्या

...//२

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खिंडार ; उपाध्यक्षंसह अनेक कार्यकर्ते शिवसेनेत

दै.रायगड नगरी । संजय कदम

पनवेल : शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड पनवेल शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली व पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे तसेच पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकुर यांच्या विशेष प्रयत्नांने, कळंबोली शहरातील पनवेल शहर राष्ट्रवादी उपाध्यक्ष व धनगर समाजाचे नेते तसेच उद्योजक आबा रामचंद्र लकडे यांच्यासह शेकडो समर्थकांनी शिवसेना पक्षात जाहीर

...//२

स्वच्छ भारत अभियानासाठी सायकल रॅली कार्यक्रम संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

इंफिनिटी फाउंडेशन पनवेल, महानगरपालिका, रायगड जिल्हा परिषद, आदई ग्रुप ग्रामपंचायत व नेहरू युवा केंद्र संघटन अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमानाने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या सायकल रॅलीचे उद्दिष्ट आजादी का अमृत महोत्सव व स्वच्छता ही सेवा स्वच्छ भारत अभियान हे होते.

या सायकल रॅलीमध्ये पनवेल क्षेत्रातील पाच सायकलिंग क्लब म्हणजे पनवेल सायकलिंग क्लब, पुश न पेडल, पेडल सिटी, के के सी सी व रनथॉन क्लबने सहभाग घेतला. या कार्यक्रमांमध्ये १०० सायकलींनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री.विधाते, पनवेल पंचायत समितीच्या सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीमती मोहिते, पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, इंफिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष श्री.आयुफ अकुला, उपाध्यक्ष मुगदा म्हात्रे, सरचिटणीस पवित्र शेरावत व आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात पनवेल महानगरपालिकेच्या कार्यालयापासून होवून सांगता जिल्हा परिषद शाळा आदई या ठिकाणी सहभागी क्लबना सर्व सायकलिस्टला सन्मानचिन्ह, मेडल व ट्रॉफी देऊन झाली.

रोहा तालुक्यात गो मातेची कत्तल करून मांस रातोरात लंपास

पहूर फाट्या नजीक घडला प्रकार कोलाड परिसरात एकच खळबळ

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

रोहा तालुक्यात हिंदू संस्कृतीला काळीमा फासेल अशी दुर्दैवी घटनाच म्हणावी लागेल असा प्रकार घडला असल्याचे निदर्शनास येत असून कोलाड परिसरात गो मातेची कत्तल करून रातोरात मांस लंपास केला गेला असल्याचे दिसून येत आहे या घटनेने कोलाड सुतारवाडी परिसरात एकच खळबळ माजली आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी की रोहा तालुक्यातील पहूर फाटा म्हणजे मुंबई गोवा महामार्गाला जोडला गेलेला मार्ग कोलाड भिरा पुणे मार्गावर असलेला पहुर फाट्या नजीक असलेल्या खडी क्रशर जवळ काही अज्ञातांनी गो मातेची हत्या करत तिला कापून तिचे मांस रातोरात टेम्पोमध्ये भरून लंपास केले असल्याचे संकेत मिळत असून सदरच्या घटनेबाबत परिसरात एकच खळबळ उडाली असून ही हिंदू संस्कृतीला काळीमा फासणारी घटनेचा निषेध सर्वत्र व्यक्त केला जात आहे.

भारत देशात हिंदू संस्कृती म्हणून गो मातेची पूजा केली जाते अशा गो मातेची विटंबना करत तीची दुर्दैवी हत्या करून मांस लंपास केला जातो याला काही या देशात राज्यात सुसूत्रता आहे की असे बोलले जात आहे. सदरच्या या ठिकाणी गाईचा पोटला त्याच प्रमाणे रक्ताचा सडा मोठ्या प्रमाणावर जमिनीवर पडलेला दिसत आहे. अशीच एक घटना आठ दहा दिवसांपूर्वी म्हणजे गणपती विसर्जनानंतर ढोकळेवाडी नजीक घडली. येथे चक्क बैलाला कापून त्याचा मास विक्रीसाठी नेल्याची घटना घडल्याचा प्रकार घडला होता.

मुंबई गोवा महामार्ग,रोहा कोलाड मार्ग तसेच कोलाड भिरा पुणे मार्गावर लगतच्या ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावर उनाड गुरं रस्त्यावर तसेच जंगलात संचार करत असतात. त्यांच्या राखणीसाठी कोणी नसतो. याचा फायदा गुरे चोरणारी टोळी घेते आहे. काही दिवसांपूर्वी ग्रामीण भागात

...//२

ईडीकडून अनिल परब यांची ८ तास चौकशी

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्याचे परिवहन मंत्री व रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री अनिल परब यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) आज मंगळवारी चौकशीसाठी कार्यालयात हजर राहण्याबाबत दुसऱ्यांदा नोटीस बजावली होती. त्यानुसार परब ईडी कार्यालयात आज दुपारी १२ नंतर चौकशीसाठी पोहचले होते. त्यानंतर ८ तासांच्या ईडीच्या चौकशीनंतर राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब ईडी कार्यालयातून सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास निघाले. अनिल परब यांनी सांगितले की, ईडीची सर्व प्रश्नांची उत्तरे दिली, चौकशीला सहकार्य केले, तपास यंत्रणेला जबाबदार आहे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊ मात्र, कोणत्या व्यक्तीच्या आरोपाला प्रश्नाला उत्तर देणार नसल्याचे परब यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले.

ऑल इंडिया सिफेरर्स युनियनचा मायदेशी परत आणलेल्या राजस्थानचे सिफेरर्सच्या कुटुंबिय व खासदारांकडून सत्कार

दै.रायगड नगरी । पनवेल

शिपिंग क्षेत्रात सातत्याने प्रशासकीय पातळीवर अगदी केंद्रापासून ते राज्य सरकारपर्यंत पाठपुरावा करणारे पनवेलसह नवी मुंबई येथील ऑल इंडिया सिफेरर्स युनियनचे संस्थापक अध्यक्ष संजय वासुदेव पवार आणि कार्याध्यक्ष अभिजीत दिलीप सांगळे यांचा उदयपूर, राजस्थान मध्ये त्यांच्या उल्लेखनीय कार्याबाबत सत्कार करण्यात आला.

एमव्ही मरीन हे जहाज सायप्रस येथे काही महिन्यांपासून अडकले होते व त्या सोबत तिथे असणारा भारतीय सिफेरर्स देखील अडकून पडले होते. भारतीय सिफेरर्सच्या कुटुंबीयांनी ऑल इंडिया सिफेरर्स युनियन अध्यक्ष संजय पवार कार्याध्यक्ष अभिजीत सांगळे यांच्याकडे मदत मागितलीवर त्यांना तात्काळ मदत उपलब्ध करून देण्यात आली. यूनियनचे कार्याध्यक्ष अभिजीत सांगळे यांनी शिप च्या मालकाशी संवाद साधून तसेच परराष्ट्र मंत्रालयाशी पत्र व्यवहार करून ११ भारतीय नाविक आपल्या अथक प्रयत्नाने मायदेशी आणले. या समयी शिपिंग क्षेत्रात कार्यरत असलेले कॅप्टन संजय पराशर यांनी देखील परराष्ट्र मंत्री यांच्याकडे भारतीय सिफेरर्स सुखरूप येण्याची मागणी केली. युनियनच्या कार्याची दखल घेत सिफेरर्सच्या कुटूंबियांनी राजस्थानातील उदयपुर येथे विशेष सत्कार समारंभ आयोजित करून संजय पवार व अभिजीत सांगळे यांचा सत्कार केला. या वेळी उदयपूरचे भाजप खासदार अर्जूनसिंह मिनाजी यांचेकडून संजय पवार व अभिजीत सांगळे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले व युनियनचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यत पोहोचविण्याचे आश्वासनही खासदार मिनाजी यांनी यावेळी दिले. कार्यक्रमाचे आयोजन उत्तम करण्यात आले होते आणि त्या आदरातिथ्या बद्दल संजय आणि अभिजीत यांनी कृतज्ञता व्यक्त केली. विशेष आभार सौ. श्वेता राठोड व संजीव सिंग यांचे मानले.

राज्य उत्पादन शुल्क विभाग रायगड-ठाणे पथकाची संयुक्त कारवाई

दै.रायगड नगरी । अलिबाग

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे राज्य आयुक्त कांतीलाल उमाप यांच्या आदेशानुसार कोकण विभाग ठाणे चे विभागीय उपायुक्त सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक श्रीमती किर्ती शेडगे, ठाणे उपअधीक्षक चारुदत्त हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी रोहा तालुक्यातील कोपरी व कोपरी दापोली येथील खाडी किनारी व खाडीमधील बेटावर अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुरुड, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक अलिबाग, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अलिबाग यांचे दुय्यम निरीक्षक, सहाय्यक दुय्यम निरीक्षक व जवान स्टाफसह यांनी छोट्या बोटी मधून जावून केलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल ३ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जाहीर नोटीस
महाराष्ट्र शासन
रोहा वन विभाग

सर्व लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमूद केल्याप्रमाणे आरागिरणीच्या परवान्याचे हस्तांतर करणेचे आहे.

जिल्हा	तालुका	गाव	स.क्र.	क्षेत्र	आरागिरणीचे नाव	परवाना क्रमांक	मशिनरीचा तपशिल
१	२	३	४	५	६	७	८
रायगड	श्रीवर्धन	गालसुरे	गट क्रमांक ८०/ब	---	महालक्ष्मी सॉ मिल, गालसुरे मु.पो.गालसुरे, ता.श्रीवर्धन, जि.रायगड	३५/२०२१ (मुळ परवाना १६/१९६७)	उभे आरायंत्र १ (४२'')

सदर आरागिरणीचा परवाना हा श्री.किरण रमेश तळकर, रा.बोर्लीपंचतन यांचे नावे असून त्यांचे कुटुंबात झालेला वाटपपत्रानुसार सदरची आरागिरणी ही श्री.निशांत रमेश तळकर, रा.बोर्लीपंचतन यांचे नावे वाटप झालेली आहे. तरी आरागिणीचा परवाना श्री.निशांत रमेश तळकर, रा.बोर्लीपंचतन यांचे नांवे हस्तांतर करण्याचा असल्याने याबाबत कोणाचा आक्षेप अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत उप वनसंरक्षक, रोहा वन विभाग रोहा, जि.रायगड यांचे कार्यालयात तक्रार आणून पोहोच घ्यावी. सदर मुदतीत तक्रार अगर आक्षेप दाखल न झाल्यास कोणाचाही आक्षेप अगर तक्रार नाही असे गृहीत धरुन उप वनसंरक्षक, रोहा यांचेकडून आरागिरणी परवाना हस्तांतर बाबत पुढील निर्णय घेण्यात येईल. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार / आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

रोहा
दि.२३/०९/२०२१

सही/-
(अप्पासाहेब निकत)
उप वनसंरक्षक,
रोहा वनविभाग, रोहा

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/१०९/१३१६/२०२१

पृष्ठ क्र.१ वरुन...

शरद पवार ठरविणार पेणचा आमदार : खा.सुनील तटकरे

यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी गंगाधर पाटील म्हणाले की, मी गेली ३० वर्षे भाजपचे निष्ठेने काम केले, मतदारसंघात निवडणुकी आधी ३५८ बूथ मी मजबूत केले. माझे कार्य पाहुन माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही जागा भाजपला जाहीर केली आणि आज या पेणमध्ये भाजपाचा आमदार आहे.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर बोलतांना खा.तटकरे म्हणाले की, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील निवडणुकी करीता पूर्वी जे आरक्षण होते तेच आरक्षण आभाधित असून केंद्र सरकारने राज्यांना आरक्षणाबाबत जेव्हढे अधिकार दिले आहेत त्यापेक्षाही जास्त आरक्षण राज्य शासनाने दिले असल्याचे सांगितले. या मेळाव्याला खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, तालुका अध्यक्ष दयानंद भगत, माजी नगराध्यक्ष संतोष शृंगारपुरे, नगरसेवीका वसुधा पाटील, जगन म्हात्रे, विकास पाटील, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, शहर उपाध्यक्ष विशाल बाफणा, बंडु पाटील, ऍड. मंगेश नेने, वडखळ सरपंच राजेश मोकल, मळेकर सरपंच शरद पाटील, उद्योजक अनिल म्हात्रे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

जासई येथे हातचलाखीने एटीएम बदलून खात्यातून केले लाखो रुपये लंपास

कमी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. आपली फसवणूक झाली असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी या बाबत उरण पोलिस ठाण्यात या अनोळखी व्यक्ती विरोधात तक्रार दाखल केली आहे. उरण पोलिस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

भरधाव ट्रेलरची दुचाकीला धडक

दुचाकीला थेट जोरदार धडक दिल्याने या दुर्घटनेत मंगेश हिलम यांचा दुर्दैवी अंत झाला असून मालवाहू ट्रेलर चालक हा पसार झाला असल्याने या बाबत एकच संतप्त व्यक्त केला जात आहे .

सदरच्या घटनेची माहिती मिळताच कोलाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी केली असून कोलाड पोस्टे गुरनं ००७७/२०२१ भा द वी कलम ३०४ए २७९ ,३३७,३३८,मोटार वाहन अधिनियम १९८८,१८४,१३४ प्रमाणे या घटनेची नोंद केली असून पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शखाली पोहवा जे एस चेरकर व एस आर माने अधिक तपास करत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खिंडार

पक्षप्रवेश करून हाती शिवबंधन बांधून घेतले.

त्याप्रसंगी शिवसेना पनवेल उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, शहरप्रमुख डि.एन. मिश्रा, शहर समन्वयक गिरिश धुमाळ, शहर संघटक अक्षय साळुंखे, उपशहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, नारायण फडतरे, महेश गुरव, पद्माकर पाटील आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोहा तालुक्यात गो माताची कत्तल करून मांस रातोरात लंपास

गुरे चोरणारी टोळी सक्रिय होती. रात्री मोकाट गुरांना गुंगीचे इंजेक्शन देऊन त्यांना टेम्पोतून नेत असल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. परंतु आता याच मोकाट गुरांची जंगलातच कत्तल करून ते मांस नेण्याइतपत मजल गुरे चोरट्यांनी मारत असल्याचे सदरच्या घटनेवरून दिसून येत आहे.

गो मातेची कत्तल करून तिचा मांस लंपास करणं ही हिंदू संस्कृतीला काळीमा फासेल असे कृत्य आहे आपल्या संस्कृतीत तीची पूजा केली जाते परंतु दुर्दैवाने तिची कत्तल करत तिची विटंबना केली जात आहे त्यामुळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. ज्या ठिकाणी गायची कत्तल केली आहे त्या ठिकाणी मोठी दुर्गंधी पसरली आहे. या गुरं चोरणाऱ्यां टोलींचा बंदोबस्त करावा अशी जोरदार मागणी केली जात आहे.

पेंट्री कारमधील कर्मचाऱ्यांवर हल्ला करणारे आरोपी जेरबंद

दै.रायगड नगरी । पनवेल

नेत्रावती एक्सप्रेसमध्ये खाद्य पदार्थ विक्री करण्यास मनाई केल्याचा राग मनात धरुन नेत्रावती एक्सप्रेसच्या पेंट्री कारमध्ये घुसून तेथील तीन कर्मचाऱ्यांवर हल्ला करुन ४५ हजाराची रोख रक्कम लुटून फरार झालेल्या आरोपींना पनवेल रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. किशन जव्हारलाल गुप्ता (२९), अली कल्लू खान (२६), भरत रामु पवार (२७), हरेकृष्ण धानप्पा बनारसे (२४) अशी या आरोपींची नावे आहेत.

लोकमान्य टिळक टर्मिनसवरुन सुटलेल्या नेत्रावती एक्सप्रेस गाडीमध्ये चिप्स केक, बिस्कीट व स्नॅक्स विकण्यासाठी घुसलेल्या अनधिकृत फेरीवाल्याला नेत्रावती एक्सप्रेस मधील पेंट्रीकार मधील कर्मचाऱ्यांनी हटकले होते. तसेच सदर गाडीत बाहेरच्या फेरीवाल्यांना खाद्य पदार्थ विकण्यास मनाई असल्याचे सांगितले होते. या कारणावरून अनधिकृत फेरीवाला व पेंट्री कारमधील कर्मचाऱ्यांमध्ये वादावादी झाल्यानंतर पेंट्रीकार मधील कर्मचाऱ्यांनी त्याला गाडीतील टीसी च्या ताब्यात दिले होते. यावेळी टीसीने सदर अनधिकृत फेरीवाल्याला सदर गाडीमध्ये पुन्हा न येण्याबाबत समज देऊन त्याला सोडून दिले होते. याच गोष्टीचा सदर फेरीवाल्याला राग आल्याने त्याने सदर गाडी पनवेलजवळ आली असताना, आपल्या चार साथीदारासह सदर एक्स्प्रेसच्या पेंट्री कारमध्ये घुसून पेंट्री कारमधील कर्मचाऱ्यांवर चाकूने हल्ला केला होता. त्यानंतर या लुटारुंनी त्यांच्यावर चहाचे उकळते पाणी फेकून त्यांना मारहाण केली होती.

त्यानंतर सदर लुटारूंनी पेंट्री कारमधील काऊंटरवर ठेवलेली ४५ हजाराची रोख रक्कम लुटून पलायन केले होते. मात्र त्यावेळी पेंट्री कारमधील तिघा कर्मचाऱ्यांनी जखमी अवस्थेत बबलु मोहम्मद अशरफ राईन (२४) याला पकडून पनवेल रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले होते. त्यानंतर पनवेल रेल्वे पोलिसांनी सदर हल्लेखोरावर जबरी दरोड्याचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या साथीदारांचा शोध सुरु केला होता. त्यासाठी रेल्वे पोलिसांनी अटकेत असलेल्या आरोपी बबलु राईन याची अधिक चौकशी करुन त्याच्याकडून त्याच्या साथीदारांची माहिती मिळाली. त्यानंतर त्याच्या चारही साथीदारांना वेगवेगळ्या ठिकाणावरुन अटक केली आहे.

क्रांतीज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे मंगळागौर संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

महिलांच्या विकासासाठी व न्याय हक्कासाठी अग्रेसर असणारी संस्था म्हणून क्रांतीज्योत महिला विकास फाउंडेशन परिचित आहे. नुकतीच क्रांतीज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे मंगळागौर कार्यक्रम पार पडला, तसेच यावेळी घेण्यात आलेल्या खेळात एकूण ६ ग्रुपने सहभाग घेतला होता.

यामध्ये रणरागिणी ग्रुप, श्रावणी ग्रुप ,फुलोरा ग्रुप, गावदेवी ग्रुप, सखी ग्रुप, मैत्री ग्रुप यांचा समावेश होता. यावेळी प्रथम क्रमांक सखी ग्रुप (पनवेल)यांनी पटकावून मनाची पैठणीचा मान मिळविला तर द्वितीय क्रमांक मैत्री ग्रुप(कामोठे) तसेच तृतीय क्रमांक श्रावणी ग्रुप (पनवेल) यांनी भरगोस प्रमाणात बक्षिसांची लूट करीत पटकविला. यावेळी परीक्षक म्हणून डॉक्टर वनिता गडदे कार्यक्रमाला लाभल्या, तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉक्टर सौ. कविता चौतमोल, माजी नगरसेविका सौ.नीता माळी, युवा नेत्या सौ.अदिती सोनार चवाते, लेखिका सौ. चित्रा देशमुख, रिमा रावल, संचिता राणे, अमिता चोहान, रुपा सिन्हा, मंदा जंगले, संगीता राऊत आदी उपस्थित होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण मोहकर यांनी केले. तर क्रांतीज्योत फाउंडेशनतर्फे अध्यक्षा सौ. रूपालिताई शिंदे उपाध्यक्षा सौ.नंदीनी गुप्ता, खजिनादार किरण अडागळे, मौसमी तटकरे, रत्नमाला पाबरेकर, रोशना घुमटकर, मिताली शिंदे, लावण्या, प्रिया व सभासद सदस्यां यांनी आलेल्या पाहुण्यांचे व सर्व ग्रुपचे आभार मानले.

मा.श्री.पांडे साहेब यांचे कोर्टात
अर्जदारातर्फे वकील
ॲड.राजेश श्रीधर पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमीनल एम.ए.क्र.९९५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.३०/१०/२०२१

श्री.मुनव्वर अब्दुल रहमान पटेल
वय : ६५ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.६६५/१, जामा मस्जिद जवळ,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८ अर्जदार

विरुद्ध

निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी/
मा.आयुक्त,
पनवेल महानगरपालिका
पनवेल-रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.मुनव्वर अब्दुल रहमान पटेल, रा.घर नं.६६५/१, जामा मस्जिद जवळ, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८ यांचा जन्म दि.०१/०६/१९५६ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : तळोजा, ता.पनवेल येथे झाला आहे आणि अर्जदार यांनी त्यांचे जन्माची नोंद होणेकरिता आदेश मिळणेबाबत पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात सदरचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार श्री.मुनव्वर अब्दुल रहमान पटेल, हे वर नमूद ठिकाणी जन्मलेले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यांचे जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२८/०९/२०२१ रोजी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

श्री.भाकरे सो.कोर्ट
वकील पि.जी.दानवले

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.१२४९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/११/२०२१

श्रीमती.मंगल रघुनाथ जाधव
अर्जदार रा.६२/६३, शिवाजी पाटील गार्डन जवळ,
सेक्टर १६, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०९ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कै.कु.सौजन्या रघुनाथ जाधव या कोपरखैरणे, नवी मुंबई येथील कायमस्वरुपी रहिवाशी होत्या. त्यांचा मृत्यू दि.१२/०७/२००९ रोजी मुंबई येथे झाल्याने अर्जदार यांनी कु.सौजन्या रघुनाथ जाधव कोपरखैरणे यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसपत्र मिळणेकामी अर्ज केला आहे.

परिशिष्ट 'अ' मिळकतीचे वर्णन

FLAT NO.502, 6 TH FLOOR, ADMEASURING BUILT UP AREA 367 SQ.FT., BUILDING NO.2, A-WING, MANSSAROVAR APARTMENT, PLOTS NO.1, 2, 4, 5, 6, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, KAMOTHE, TALUKA PANVEL, DIST RAIGAD

वरील अर्जदार श्रीमती.मंगल रघुनाथ जाधव या कै.कु.सौजन्या रघुनाथ जाधव यांच्या आई आहेत. त्याप्रमाणे ते कै.कु.सौजन्या रघुनाथ जाधव ह्यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते कै.कु.सौजन्या रघुनाथ जाधव यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.राजी बालाकृष्ण, राहणार : ई-१२/१४, श्रावस्ती सोसायटी, जी.एम.एल. रोड, इनॉरबीट मॉल जवळ, मालाड वेस्ट, मुंबई ४०००६४. तरी आमचे अशिल यांचे नावे असलेले सदनिका नं.के.एल.४/३४/१, तळमजला, बिल्डींग नं.के.एल.४/३४, शिव सागर अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन प्लॉट नं.४ ई/६, सेक्टर-४ ई, कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८. क्षेत्रफळ-२३.५ चौ.मी. मी या सदर सदनिकेचे मुळ १) पॅजेशन लेटर दिनांक २९/०३/१९८८. २) अलॉटमेंट लेटर ३) डीड ऑफ अपार्टमेंट दिनांक १५/०२/१९९४ सिडको लि. आणि सविता दामोदर पानीकर, दस्त क्र.पवल/१/४४९/१९९४. ४) फलॉर प्लॉन कॉपी यांच्याकडून गहाळ झालेली आहे.

खालील परिशिष्टात नमूद केलेला सदर मिळकतीबाबत कोणाचाही विक्री, देवाण-घेवाण, गहाण, विश्वस्त संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, बक्षिस, मृत्यूपत्र, वाटप पत्र व इतर कोणतेही स्वरुपाचा करार असल्यास अगर इतर कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध असल्यास यांच्या पृष्ट्यार्थ सर्व कागदपत्रांची पुराव्यासह खालील कार्यालयीन पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत सुचित करणे आवश्यक आहे. जर असा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरच्या रुमबाबतीत कोणाचाही व कसलीही हरकत आल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर परिशिष्टात वर्णन केलेल्या रुम बाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

सदनिका नं.के.एल.४/३४/१, तळमजला, बिल्डींग नं.के.एल.४/३४, शिव सागर अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन प्लॉट नं.४ ई/६, सेक्टर ४ ई, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८

सही/-
ॲड.राजेश आर. चौधरी
शॉप नं.०८, कृष्णा टॉवर,
सेक्टर ५ ई, कळंबोली,
नवी मुंबई-४१०२१८

मा.गोडसे मॅडम
अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२७६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/१०/२०२१

१) श्री.विजय रोहिदास भोईर, वय : ४९ वर्षे
२) श्री.दयाघन रोहिदास भोईर, वय : ४८ वर्षे
३) श्री.जितेंद्र रोहिदास भोईर, वय : ४६ वर्षे
४) श्री.प्राण रोहिदास भोईर, वय : ४५ वर्षे
क्र.१ ते ४ रा.भेंडखळ गांव,
पो.जे.एन.पी.टी., ता.उरण, जि.रायगड
५) मिलन रोहिदास भोईर उर्फ
सौ.मिलन जयंता पाटील, वय : ३६ वर्षे
रा.सांभुरी कुर्दुस, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. रोहिदास बाळकृष्ण भोईर हे दि.२९/०१/२०२० रोजी भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांची पत्नी बयाबाई रोहिदास भोईर या दि.०७/०२/२०१३ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाचे मिळकतींबाबत वारसदाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

जमिनींचे वर्णन

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार रु.पै.
भेंडखळ-४/८२	३०१	१४	०-०८-०	०.९१
	३०१	१	०-११-५	१.२५
	२८१	७	०-०८-८	१.२५
	२७१	६	०-०४-३	०.६६
	२६६	४	०-०६-६	१.०६
	२५२	११	०-१३-०	२.०७
	२८७	१०	०-१४-०	१.९४
	२६३	४	०-२०-०	३.२४
भेंडखळ-६१	३	२	०-०७-७	०.४१

अर्जदार हे कै.रोहिदास बाळकृष्ण भोईर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.२८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

पर्यटन व्यवसायिकांसाठी आवास येथे अभिषेक नाईक यांचे व्याख्यान संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्था, अलिबाग-रायगड आणि लायन्स क्लब मांडवा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यटन दिनानिमित्त सोमवारी (२७ सप्टेंबर) रोजी शिवांजली हॉलीडे होम, आवास, अलिबाग येथे पर्यटन व्यवसायिकांसाठी 'हाऊसकीपिंग' यासंदर्भात मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, अलिबागचे प्राचार्य अभिषेक नाईक यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्था, अलिबाग-रायगडचे अध्यक्ष निमिष परब, लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष मोहन पाटील, शिवांजली हॉलीडे होमचे संचालक आमिष शिरगावकर, मुकुंद संसारे, नितीन नाईक, आल्हाद जाधव, सुधीर पूरव, मनोज घरत, बाबू राणे, आशिष शिरगावकर, स्वाती बर्वे, जितेंद्र ठाकूर, नितीन अधिकारी, हर्षद पाटील, सुमीत पाटील, अजय अंगणे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आपल्या व्याख्यानात प्राचार्य अभिषेक नाईक यांनी पर्यटन व्यावसायिक आणि पर्यटक यांच्यामध्ये आपुलकीचे संबंध निर्माण होणे गरजेचे असल्याचे सांगितले. हे आपुलकीचे संबंध चांगले आतिथ्य केल्याने होते. पर्यटक वारंवार यावा यासाठी पर्यटन व्यावसायिकांनी स्टँडर्ड निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच पर्यटन व्यवसायिकांनी स्वीमिंगपुलाव्यतिरिक्त इतरही खेळाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास पर्यटकांना त्या-त्या कॉटेज, रिसॉर्ट, हॉलीडे होममध्ये वारंवार यावेसे वाटेल., असे अभिषेक नाईक यांनी सांगितले तसेच याबाबत सविस्तर माहिती दिली.अखेर अमिष शिरगावकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पर्यटन व्यावसायिक उपस्थित होते.

प्रेरणा मतिमंद मुलांच्या शाळेची नवीन कार्यकारिणी जाहीर

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

रोहा येथील ज्ञानगंगा बहुविकलांग संस्था संचलित प्रेरणा मतिमंद मुलांच्या शाळेची नवीन कार्यकारिणी निवड करण्यात आली. प्रेरणा मतिमंद मुलांच्या शाळे ची दिनांक २६ /०९ / २०२१रोजी ४.३० वाजता दगडी शाळा मेहेंदळे हायस्कूल समोर शाळेच्या हाल मध्ये घेण्यात आलेल्या जाहीर सभेत पुढीलप्रमाणे बिनविरोध निवड करण्यात आली अध्यक्षपदी सौ. दर्शना आठवले, उपाध्यक्ष संजय आर्ते, सचिव अशोक जोशी, सहसचिव राजश्री आठवले, खजिनदार रामनरेश कुशवाहा, सहखजिनदार श्री निवास वडके , सदस्य श्रिया जोशी सदर सभेमध्ये मागील सभेचा अजेंडा वाचुन मंजूर करण्यात आला, अध्यक्षा दर्शना आठवले यांनी हिशोब वाचुन झाले नंतर सर्वानुमते मंजूर करण्यात आला. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी च्या विषयांवर विचार विनिमय करण्यात आले. या वेळी अध्यक्षांनी शाळे विषयी माहिती देताना सांगितले आपली आपली शाळा ज्ञानगंगा बहुविकलांग संस्था ही एक शासनमान्य स्वयंसेवी संस्था आहे मुलांच्या / व्यक्तींच्या क्षेत्रात २ ऑक्टोबर २००६पासून १५वर्षे अविरतपणे सुरू आहे या शाळेत ३५ विद्यार्थी विशेष सेवांचा लाभ घेत आहेत ते पुढे संस्थेच्या भविष्यातील योजनांची माहिती देताना म्हणाले संस्थेच्या स्वतःच्या मालकीची जागा व सुसज्ज इमारत, संस्थे साठी वाहनं व्यवस्था, वस्तीगृहा, व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र, शिक्षक प्रशिक्षण केंद्र, ग्रंथालय, संशोधन केंद्र आदी योजना आहेतं त्या डोळेंच्या समोर ठेवून नवनिर्वाचित कमेटी कामं करायचे आहे सदर सभा खेळीमेळीच्या वातावरण संपन्न झाली.

ड्रग इन्स्पेक्टर व डीएसपी असल्याचे भासवून उलवेतील फार्मासिस्टला घातला गंडा

अज्ञात जोडप्याचा पोलिसांकडून शोध सुरु

दै.रायगड नगरी । पनवेल

मेडीकल दुकानातून घेतलेले मुदतबाह्य खाद्य पदार्थ खाल्ल्यामुळे मुलाला रुग्णालयात दाखल करावे लागल्याचे सांगत एका जोडफ्याने, ड्रग इन्स्पेक्टर व डीएसपी असल्याचे भासवून मेडीकलच्या दुकानावर ड्रग इन्स्पेक्टरकडून कारवाई करण्याची भिती दाखवून, उलवेतील एका महिला फार्मासिस्ट कडून २७ हजाराची रक्कम उकळल्याची घटना उघडकिस आली आहे. न्हावा शेवा पोलिसांनी फसवणुक करणाऱ्या जोडप्यावर गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या घटनेत फसवणूक झालेली महिला मेडीकल फार्मासिस्ट असून तिचे उलवे भागात स्वत:चे मेडीकलचे दुकान आहे. या फार्मासिस्ट महिलेच्या मोबाईलवर एका अज्ञात व्यक्तीने ड्रग इन्स्पेक्टर असल्याचे भासवून संपर्क साधला. तसेच त्यांनी गत ऑगस्ट महिन्यात एका महिलेला मुदतबाह्य झालेले सेरेलॅक विकल्याचे व त्या सेरेलॅकमुळे सदर महिलेच्या लहान मुलाला त्रास होऊन त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे लागल्याचे सांगितले. सदर महिला डीएसपी असल्याचे व त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन त्यांच्या केमिस्टवर कारवाई करण्यात येत असल्याची भिती दाखविली. तसेच त्यांच्या फार्माचे लायसन्स दुपारी ३ वाजेपर्यंत रद्द होऊन तिला अटक होणार असल्याचे सांगितले. याबाबत खात्री करण्यासाठी डीएसपी मॅडम सोबत बोलण्यास सांगितले. फार्मासिस्ट महिलेने डीएसपी महिलेला संपर्क साधल्यानंतर समोरील महिलेने देखील ती डीएसपी असल्याचे व नेरुळ येथे काम करत असल्याचे सांगितले. तसेच ५ ऑगस्ट रोजी तिला मुदतबाह्य झालेले सेरेलॅक दिल्यामुळे त्यांच्या मुलाला त्रास होऊन त्याला रुग्णालयात दाखल करावे लागल्यामुळे तिच्या विरोधात तक्रार केल्याचे सदर महिलेने सांगितले. तसेच तिचे मेडीकल लायसन्स रद्द करुन ६ महिने तिचे मेडीकल दुकान बंद करण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे घाबरलेल्या फार्मासिस्ट महिलेने डीएसपी महिलेला तक्रार मागे घेण्याबाबत विनंती केली असता, डीएसपी महिलेने ३ वाजण्याच्या आत ड्रग इन्स्पेक्टर सोबत बोलून दंडाची रक्कम भरुन घेण्यास सांगितले. त्यामुळे फार्मासिस्ट महिलेने ड्रग इन्स्पेक्टरला संपर्क साधल्यानंतर त्याने दंडाची रक्कम २७५०० रुपये व हॉस्पीटलचे बिल १९३०० असल्याचे व या दोन्हीपैकी एक रक्कम भरण्यास तिला सांगितले. यावर फार्मासिस्ट महिलेने हॉस्पीटलचे १९३०० रुपयांचे बिल भरण्याची तयारी दर्शवून डीएसपी महिलेने दिलेल्या पेटीएम नंबरवर पैसे पाठवून दिले.

त्यानंतर फार्मासिस्ट महिलेला ड्रग इन्स्पेक्टरची ८०७५ रुपये दंडाची रक्कम पाठविण्यास भाग पाडले. त्यानंतर फार्मासिस्ट महिलेने ड्रग इन्स्पेक्टरला संपर्क साधुन हॉस्पीटलच्या बिलाची व दंडाची रक्कम भरल्याचे सांगून तिच्या मेडिकल दुकानातून घेतलेले मुदतबाह्य सेरेलेकच्या पॅकेटचे फोटो पाठविण्यास सांगितले. मात्र त्याने सदर फोटो पाठविण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे फार्मासिस्ट महिलेने डीएसपी महिलेला संपर्क साधल्यानंतर तिने देखील फोन घेतले नाहीत. त्यानंतर आपली फसवणुक झाल्याचे फार्मासिस्ट महिलेच्या लक्षात आले. त्यानंतर फार्मासिस्ट महिलेने न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात जोडफ्या विरोधात फसवणुकिचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

तोक्ते चक्रीवादळ नुकसानग्रस्त आदिवासी कुटुंबांना मोफत धान्य व ताडपत्री वाटप

दै.रायगड नगरी । अलिबाग

ॲटलस कॉप्को व दीपक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने तोक्ते चक्रीवादळात नुकसान झालेल्या आदिवासी कुटुंबांना मोफत धान्य व ताडपत्री वाटप करण्यात आले. त्यात अलिबाग तालुक्यातील २१ आदिवासीवाड्या मध्ये मठ्वाडी, पाठवाडी, दिवीवाडी, वळवलीवाडी, सागवाडी, गंगेचीवाडी, आंबेवाडी, रायशेतवाडी, राजेवाडी, जांभूळवाडी, खैरवाडी, पिंपळवाडी, मोरोंडेवाडी, बारशेतवाडी, सत्तेवाडी, सुडकोलीवाडी, कुसुंबळेवाडी, चिखलीवाडी, कोंझरवाडी, तळाशेतवाडी, पोयनाडवाडी यांतील १५०० कुटुंबांना धान्य वाटप तर वादळात ज्या घरांचे नुकसान झालेले आहे अशा २५० कुटुंबांना ताडपत्री वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी अलिबाग तहसील अधिकारी मा. सचिन सेजवल, महिला व बालकल्याण सदस्या चित्रा पाटील, आय. सी. डी. एस प्रकल्प अधिकारी गीतांजली पाटील, अंगणवाडी सुपरवायझर उल्का कुलकर्णी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका व मदतनीस, रेवदंडा कॉलेजचे मुख्याध्यापक तसेच दीपक फाउंडेशनचे प्रकल्प समन्वय अजय आवाडे त्यांच्या सोबत मल्लेश हंचली, ओजास्विनी महाडिक, प्रीती जवरत, रोहिणी भगत, तृणाली पाटील, वैभव काटकर यांनी सहकार्य केले.

सुधागडात भाजपला धक्का ; असंख्य कार्यकर्ते शेकापक्षात दाखल

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

सुधागड तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष संघटना गाव, वाड्यावस्त्या, खेडो पाड्यात भरभक्कमपणे रुजली आहे. शेकापक्षाच्या माध्यमातून ठिकठिकाणी विकासात्मक व लोकाभिमुख कामे मोठ्या प्रमाणावर झाली आहेत व होत आहेत. शेकापक्षाच्या विकासात्मक कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन येथील कळंब धनगरवाडी येथील असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपला धक्का देत शेकापचा लालबावटा दिमाखात फडकवला आहे. सर्व प्रवेशकर्त्यांचे शेकाप नेते तथा जि. प सदस्य सुरेशशेठ खैरे यांनी स्वागत केले. तरुण तडफदार व सक्षम नेतृत्व धैर्यशिलदादा पाटील व धडाडीचे शे.का.प नेते सुरेशशेठ खैरे यांच्या कुशल नेतृत्व व प्रभावी कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून तसेच विकासकामांवर आकर्षित होऊन शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवाहात सामिल झालो असल्याचे प्रवेशकर्त्यांनी यावेळी सांगितले.

प्रवेशकर्त्यात अनंता ढेबे, धोंडू ढेबे, धाऊ ढेबे, राजेश ढेबे, भगवान ढेबे, चंद्रकांत ढेबे, लक्ष्मण ढेबे, किरण खरात, दीपक खरात, महेश खरात, बापू बावदाने, सुनिल बावदाने, भगवान बावदाने, राजेश बावदाने, महादेव बावदाने, दशरथ बावदाने, नरेश आखाडे, तुकाराम आखाडे, रामा आखाडे, प्रकाश झोरे, तुकाराम राया आखाडे, बबन झोरे, वसंत झोरे, गौरु बेलोसे, उमा बडतोड आदींचा समावेश आहे. यावेळी शेकाप नेते सुरेशशेठ खैरे म्हणाले की सुधागड तालुक्यात शेकापच्या माध्यमातून अत्यंत मूलभूत व ज्वलंत असणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यश आले आहे. शेकापच्या माध्यमातून ठिकठिकाणी नळपाणी पुरवठा योजना यशस्वीरीत्या कार्यान्वित केल्या आहेत. तसेच दुर्गम दुर्लक्षित भागासह आदिवासी वाड्या पाड्याना रस्ते जोडणेकामी शेकापची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. जिल्हा परिषद, जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीद्वारे मोठ्या प्रमाणावर विकासकामे करण्यात आली आहेत, शेतकरी कामगार पक्षाचा जोर दिवसागणिक वाढत आहे. पक्षसंघटना मजबूत होत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षात युवकांसह महिला व ज्येष्ठ कार्यकर्त्याचा होत असलेला प्रवेश म्हणजे संघटनेला मोठी बळकटी व उभारी मिळणार असल्याचे शेकाप नेते तथा जी. प सदस्य सुरेश शेठ खैरे यांनी सांगितले. खैरे पुढे म्हणाले की शेतकरी कामगार पक्षाने नेहमीच कष्टकरी, श्रमजिवी, शोषीत, पिडीत, वंचीत, सर्वसामान्य घटकाच्या उत्कर्षासाठी झोकून देवून काम केले आहे. या पक्षात त्यांना काम करण्यासाठी मोकळीक व संधी दिली जाईल. असे सुरेश शेठ खैरे यावेळी म्हणाले.

मा.राव साहेब कोर्ट
अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२७७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/११/२०२१

१) श्री.दिपक रामदास भोईर, वय : ५८ वर्षे
रा.बोरी, ता.उरण, जि.रायगड
२) श्री.शिवनाथ रामदास भोईर, वय : ५२ वर्षे
रा.बोरी, ता.उरण, जि.रायगड
३) सौ.जागृती जगदीश म्हात्रे, वय : ५६ वर्षे
रा.मुळेखंड, ता.उरण, जि.रायगड
४) श्रीमती.सारिका ज्योतीराज भोईर, वय : ४२ वर्षे
५) श्री.करण ज्योतीराज भोईर, वय : १९ वर्षे
६) कु.रुद्र ज्योतीराज भोईर, वय : ११ वर्षे
क्र.६ ची अज्ञान पालन करणार आई
श्रीमती.सारिका ज्योतीराज भोईर
रा.घर क्र.७०९ बी, यु.ई.एस. हायस्कूल,
पलक मैदान जवळ, बोरी, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. रामदास शिमग्या भोईर हे दि.०५/१२/२००३ रोजी मौजे : बोरी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांची पत्नी कै.जानकीबाई रामदास भोईर या दि.११/०६/२०१० रोजी मयत झाले आहेत. तसेच मुलगा कै. ज्योतीराज रामदास भोईर हे दि.०५/०७/२०२० रोजी मयत झाले आहेत. कै.रामदास शिमग्या भोईर यांच्या खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत अर्जदार यांनी वारसदाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

जमिनींचे वर्णन

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार रु.पै.
न्हावे-३३३	अे	२३२	०-३१-४	१.७५
	अे	२६७	०-१३-०	०.८७

अर्जदार हे कै.रामदास शिमग्या भोईर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.सौ.गोडसे साहेब यांचे कोर्टात
वारसांचे सर्टिफिकेटबद्दल जाहीरनामा दिवाणी अ.१५० रा. Civ. A 150 m
ॲड.शैलजा सलागरे
प्रोसेस जमा रु.५०/- अर्जदार यांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.१२९६/२०२१
ने.ता.१५/१०/२०२१

१) श्रीमती.सिताबाई तुळशीराम म्हात्रे
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.विजय तुळशीराम म्हात्रे
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.जयवर्धन तुळशीराम म्हात्रे
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
४) श्री.प्रभाकर तुळशीराम म्हात्रे
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्व रा.मु.पो.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदार यांची आई कै.तुळशीराम बंडू म्हात्रे यांचे दि.११/०५/१९ रोजी कामोठे येथे निधन झाले. मयत कै.तुळशीराम बंडू म्हात्रे यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

क्रं.	गाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
१	कामोठे	७२	८	०-११-६
२	कामोठे	७३	५	०-१५-२
३	कामोठे	८५	११+१२	०-४-०
४	कामोठे	१५५	४	०-११-९
५	कामोठे	१७३	१	०-१०-६
६	कामोठे	१५५	६/२	०-०८-६
७	कामोठे	८५	३+७ क	०-१-५
८	कळंबोली	२२	१ अ	०-१४-४
९	कळंबोली	२७	३ क	०-४-८
१०	कामोठे	७७	३	०-२-५
११	कामोठे	६२	४ पी	०-२-५
१२	रोडपाली (आंबेतखार)	१+२ ते १५, ८० ते १२९+ १४१ ते १४६ ४३७	२९१	०-५०-१
१३	पनवेल	६१५	६	०-४६-६
१४	पनवेल	६६१	१	०-७०-८
१५	पनवेल	६१५	७	०-५२-७

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

प्रो.जमा रु.५०/- अर्जदारतर्फे वकील ॲड.श्री.मनोज म्हात्रे
ॲड.ज्योती सरोदे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश श्री.राव साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११८७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/१०/२०२१

१) श्रीम.स्मिता चंद्रकांत पाठक
वय : ६७ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
२) श्री.आनंद चंद्रकांत पाठक
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.पारिजात बंगला, प्लॉट नं.१२,
कुलगाव हौसिंग सोसायटी, गांधी चौक
काटधरे हॉलच्या मागे, बदलापूर (पू.), पिन कोड-४२१५०३
३) श्री.अजित चंद्रकांत पाठक
वय : ४१ वर्षे, धंदा : शेअर मार्केटींग
अर्जदार १ व ३ रा.सुमा बंगला,
विजयदीप सोसायटी, गोपाळ नगरच्या समोर,
कुळगाव (पु.) एमआयडीसी रोड, पिन कोड-४२१५०३ अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडिलांची आई कै.निर्मलाबाई धुंडीराज पाठक यांचा मृत्यू दि.११/०३/२००३ रोजी कुळगाव बदलापूर येथे झालेला असून कै.निर्मलाबाई धुंडीराज पाठक या हयात असताना त्यांच्या आणि अर्जदार क्र.२ व ३ यांच्या एकत्रित व संयुक्त नोंदणी क्र.३१६९/१९९० दिनांक १०/१२/१९९० रोजी स्वसंपादीत उत्पन्नातून नोंदणीकृत AGREEMENT FOR SALE OF SELF CONTANED RESIDENTIAL FLAT या कराराने खरेदी केलेल्या निवासी सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे.

निवासी सदनिकेचे इंग्रजीमध्ये वर्णन खालीलप्रमाणे

All that piece or parcel of non-agreecultural land admeasuring about Sq. Mtrs. out of city S. No.517 B & 518 A, within the Panvel Municipal Corporation, Panvel, Dist-Raigad, Being & situated the Flat No.201 On 2nd floor of the said building known as "SHRI SAI NARAYAN DARSHAN" area Admeasuring about 464 Sq. fts., Super built up area. in the building of "SHRI SAI NARAYAN DARSHAN" Co-Op. Housing Society Ltd., Panvel, Tal-Panvel, Dist-Raigad.

तसेच कै.निर्मलाबाई धुंडीराज पाठक यांचा मुलगा कै.चंद्रकांत धुंडीराज पाठक यांचा मृत्यू दि.२५/०४/२०२१ रोजी गोपाळ नगर, सुमा बंगला, कर्जत रोड, विजय दिप सोसायटी, कुळगाव, बदलापूर, अंबरनाथ, ठाणे, महाराष्ट्र ४२१५०३ येथे झालेला असल्यामुळे कै.निर्मलाबाई धुंडीराज पाठक यांच्या एक तृतीयांश हिस्सा, हक्क, अधिकारामध्ये मुलगा कौ.चंद्रकांत धुंडीराज पाठक यांचा वारसाईने कायदेशीर हक्क अधिकार आणि हिस्सा आहे. परंतु कै.निर्मलाबाई धुंडीराज पाठक या व त्यांचा मुलगा कै.चंद्रकांत धुंडीराज पाठक या दोघांचाही मृत्यू झालेला असल्यामुळे या दोघांच्या मृत्यू पश्चात कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला मिळावा याकरिता अर्जदार यांनी सदरचा दिवशी चौकशी अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे. कै.निर्मलबाई धुंडीज पाठक यांचा मुलगा कै.चंद्रकांत धुंडीराज पाठक त्यांच्या मृत्यूनंतर सर्व अर्जदार हे कै.चंद्रकांत धुंडीराज पाठक यांचे कायदेशीर वारसदार आहेत.

वरील घराच्या संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारसदाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.१८/०९/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

श्री.भाकरे सा.कोर्ट
प्रोसेस जमा रु.५०/- वकील श्रश्री.बी.एम.कोल्हे
पनवेल, नवी मुंबई

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१३१८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/१२/२०२१

ज्यापेक्षा कै.प्रभाकर तुळशीराम पाटील राहणार मौजे : मु.पो.खारघर गाव, गावदेवी मंदिरा जवळ, सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.२७ माहे जानेवारी सन २०२१ रोजी किंवा त्या सुमारास राहत्या घरी मौजे : मु.पो.खारघर गाव, गावदेवी मंदिरा जवळ, सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहे. अर्जदार नं.१) श्रीमती.उज्वला प्रभाकर पाटील, २) श्री.शुभम प्रभाकर पाटील विरुद्ध १) रक्षा प्रभाकर पाटील, २) श्रीमती.गोमुबाई तुळशीराम पाटील रा.खारघर गाव, गावदेवी मंदिराच्या जवळ, सेक्टर १३, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ह्याने या कोर्टास सदरहू मयत कै.प्रभाकर तुळशीराम पाटील यांचा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. कै.प्रभाकर तुळशीराम पाटील यांचे नावे असलेली मिळकत पुढीलप्रमाणे :

मिळकतीचे वर्णन

Sr. No.	Details of the Properties
1	**C.T.S.No.13, Property No.62 B,** First Floor, R.C.C. Construction admeasuring area about 832 Sq. Fts. situated at Kharghar Village, Kharghar, Tal-Panvel & Dist-Raigad, Navi Mumbai. Valued at Rs.46,62,602.2/-
2	**C.T.S.No.13, Property No.744 A,** situated at Kharghar Village, Kharghar, Tal-Panvel & Dist-Raigad, Navi Mumbai. a) Room No.1, Ground Floor, R.C.C. Construction admeasuring area about 160 Sq. Valued at Rs.9,46,468.4/- b) Room No.2, Ground Floor, R.C.C. Construction admeasuring area about 200 Sq. Fts. Valued at Rs.11,83,085.5/- c) Room No.3, Ground Floor, R.C.C. Construction admeasuring area about 177 Sq. Fts. Valued at Rs.10,47,030.7/- d) Room No.4, Ground Floor, R.C.C. Construction admeasuring area about 130 Sq. Fts. Rs.7,690,05.5/-
3	**C.T.S.No.13, Property No.744 D,** situated at Kharghar Village, Kharghar, Tal-Panvel & Dist-Raigad, Navi Mumbai. a) Room No.301, Third Floor, R.C.C. Construction admeasuring area about 160 Sq. Fts. Valued at Rs.8,96,654.28/- b) Room No.302, Ground Floor, R.C.C. Construction admeasuring area about 200 Sq. Fts. Valued at Rs.11,20,817.8/- c) Room No.303, Ground Floor, R.C.C. Construction admeasuring area about 170 Sq. Fts. Valued at Rs.9,52,695.17/- d) Room No.304, Ground Floor, R.C.C. Construction admeasuring area about 130 Sq. Fts. Valued at Rs.7,28,531.6/-

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांचा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७ माहे सप्टेंबर २०२१ रोजी माझे सहीने दिले.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

सर्पमित्र सागर दहिंबेकर आणि टिमने दिले १० फुट अजगरास जीवदान

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

रोहे तालुक्यातील संभे गावचा सुपुत्र व सर्पमित्र सागर दहिंबेकर आणि त्याचे अन्य सर्पमित्र परिवार यांनी १० फुट अजगरास मोठ्या कौशल्याने पकडून जीवदान दिले आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार सोम.दि.२७ रोजी रात्री ८ वा.सुमारास संभे स्टॉपजवळील निशिकांत सानप यांच्या फर्निचर शॉपमध्ये लाकडी फर्निचर असलेल्या ठिकाणी अजगर दडून बसला असल्याची माहिती सर्पमित्र सागर दहिंबेकर याला मिळताच सागरनेही याबाबत आपले अन्य सर्पमित्र अजय भोसले, निलेश लोखंडे, अजय राजीवले, प्रथम भालेकर, संदेश यादव, सुरज भिसे, नितीन भोसले यांच्याशी संपर्क साधला. व या आपल्या टीमला घेऊन पोहचला.

लाकडी फर्निचरमध्ये दबा धरून बसलेल्या भल्या मोठ्या लांबीच्या अजगरास मोठ्या शितापिने अजगराला पकडुन कोलाड विभाग वनाधिकारी राजेश तलकर,प्रवीण शिंदे यांच्या ताब्यात दिले व वन अधिकारी यांनी या अजगराचे उंची व वजन तपासले असता १० फुट लांब व १५.५० किलो ग्र. इतके वजन भरले.

रेस्कु टीमचे सागर दहिंबेकर, अजय भोसले, निलेश लोखंडे, अजय राजीवले, प्रथम भालेकर, संदेश यादव, सुरज भिसे, नितीन भोसले यांनी पकडलेल्या १० फुट अजगरास वनाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षितरित्या जंगलात सोडून दिले.तर सर्पमित्रांच्या या टिमचे सर्वत्र कौतूक होताना दिसत आहे.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

२००५ च्या दरडग्रस्त कोतवाल अन् कोंढवी पुनर्वसनाच्या अपयशी पॅटर्नची

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केवनाळे व सुतारवाडी येथेही पुनरावृत्ती?

दै.रायगड नगरी । शैलेश पालकर

पोलादपूर : तालुक्यात २००५ नंतर तब्बल १६ वर्षांनंतर साखर सुतारवाडी आणि केवनाळे येथे गेल्या २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या भूस्खलनानंतर एकूण ११ जणांचे बळी जाऊन पुनर्वसनाचे काम हाती घेण्यात येत आहे. मात्र, आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बाधित आणि संबंधित दरडग्रस्त गावांतील अन्य कुटूंबियांचे पुनर्वसन कार्य करण्यासोबतच मतांची बेगमी करण्याचे राजकारण होऊ घातल्यास २००५ च्या दरडग्रस्त कोतवाल अन् कोंढवी पुनर्वसनाच्या अपयशी पॅटर्नची केवनाळे व सुतारवाडी येथेही पुनरावृत्ती घडू शकण्याचे संकेत प्राप्त होत आहेत.

साखर सुतारवाडी येथे ६ तर केवनाळे येथे ५ जणांचे बळी दरडीखाली गेले. यापैकी केवनाळे गावाचा जिऑलॉजिकल सर्व्हे अहवाल वर्ग १ मध्ये आला आहे. जिऑलॉजिकल सर्व्हेचा अहवाल प्राप्त झाला नसलेल्या आंबेमाचीतील लोक स्थलांतरीत होण्यासाठी विरोध करीत असताना तेथील फार्महाऊसचेही स्थलांतर केले जाणार काय, हा अनुत्तरित प्रश्न ग्रामस्थांना भेडसावणारा आहे. तालुक्यातील दाभिळ, हळदुळे, चिरेखिंड, वाकण धामणेची वाडी, कुडपण खुर्द व कुडपण बुद्रुक, किनेश्वर, खोपड, चांदके अशा सुमारे १८ गांवांमध्ये दरडीचा धोका निर्माण झाला असताना मोठी लोकसंख्या दरडप्रवण क्षेत्रामध्ये वास्तव्य करीत असल्याने पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशावेळी, दरडग्रस्तांचे मसिहा बनण्याची मानसिकता काही राजकीय नेतृत्वामध्ये तयार झाली असताना सरकार आणि जनतेतील दुवा बनण्याऐवजी गोष्टीतील दोन माकडांच्या भांडणात खवा फस्त करणाऱ्या बोक्यासारखे वर्तन होण्याआधी जनता आणि सरकारने आपसात माकडांसारखी ओढाताण न करता समन्वय करण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरडी हटविण्याच्या कामी सरकारतर्फे अधिग्रहित करून उपलब्ध करण्यात आलेल्या पोकलेन, जेसीबी, डम्पर्स, रोडर, लोडर सारख्या अजस्त्र यंत्रणांसोबत सरकारनेच डिझेल उपलब्ध करून दिले. या कामाची बिले राजकीय पक्षांच्या प्रमुखांकडून त्यांच्या ठेकेदारांकरवी सादर होऊन सरकारकडून अदा केली जाणार आहेत. तात्पुरती निवास व्यवस्था म्हणून उभारण्यात आलेल्या कंटेनर केबिनची घरे उभी करण्यासाठी काँक्रीटचा बेसमेंट तसेच तात्पुरत्या निवारा शेडमधील वास्तव्यादरम्यान शौचालये उभारण्यासाठी जो तातडीचा खर्च केला जात आहे. त्यासाठी सरकारकडून दिला जाणारा निधीदेखील राजकीय पक्षांच्या प्रभावाने खर्च होत आहे. साखर सुतारवाडीतील १० घरे पूर्ण बाधित असताना ४४ घरांसाठी जमिनीचा शोध सुरू आहे तर काहींनी पोलादपूर शहरात होऊ घातलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलांची मागणी केल्याची चर्चा घडवून काही परस्पर साध्य करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

केवनाळेसोबत आंबेमाचीच्या पुनर्वसन स्थलांतराची चर्चा सुरू असताना तेथे उपलब्ध जमिनीचे दर वाढविण्यापासून नवीन घरांमध्ये स्थलांतरीत झाल्यानंतरही सध्याच्या घरांच्या इमारतींमधील वास्तव्याची ऑफ दि रेकॉर्ड ग्वाही दिली जात आहे. जनता आणि सरकार यांच्यामध्ये दुवा असलेल्यांनी खवा खावा अशी परिस्थिती होऊ नये, याबाबत दक्षता कोणी घ्यावी यासाठी विधायक विरोधीपक्षदेखील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी एकतर मुद्दे मिळतील नाहीतर यातील नाराज मतदार आणि तयारी झालेले परंतू उमेदवारी न मिळालेले सुसज्ज कार्यकर्ते मिळतील अशा अपेक्षेने विरोधाची भूमिका टाळत आहेत. कोटक महिंद्रा बँकेने १०० घरे बांधून देण्याची तयारी दाखविली असली तरी या घरांचे स्वरूप कसे असावे, हे निश्चित करण्याची मानसिकता केवळ राजकीय पक्षनिहाय आधारित असण्याने यासाठी जमिनी उपलब्ध करून देण्यापासून त्यावर घरे बांधून देण्यापर्यंत तसेच अन्य सोयीसुविधांनी परिपूर्ण करण्याची कार्यवाही कितपत शक्य आहे, यासाठी पोलादपूर तालुक्यातील यापूर्वीच्या कोंढवी आणि कोतवाल येथील पुनर्वसन घरकुलांची सद्यस्थिती विचारात घेण्याची आवश्यकता आहे.यामध्ये वाटाघाटीचे काम करणाऱ्या पाठिंबा प्राप्त राजकीय पक्षांना ठेकेदारीची कामेदेखील विनासायास मिळणार आहेत. याखेरिज, सामाजिक बिगरराजकीय यंत्रणांचा प्रभाव निर्माण करण्यापूर्वी राजकीय मानसिकतेशी प्रशासनाची लिनता पाहता श्रेयवादाचा पुरस्कार या सर्व पुनर्वसन कार्यातून होऊ शकत आहे.

२००५ च्या अतिवृष्टी, महापूर आणि भूस्खलनानंतर ज्याप्रमाणे कोतवाल आणि कोंढवीतील पुनर्वसन घरकुलांचा लाभ देण्यासाठी घरपट्टीच्या उताऱ्याचे अ, ब, क, ड असे चार भाग करून एका बाधिताला चार घरे देण्याचा आभास निर्माण करून बाधितांना या आमिषाला भुलविण्याचा प्रयत्न राजकीय पक्षांना मतांच्या बेगमीसह बाधितांचा प्रचंड पाठिंबा प्राप्त करण्याची संधीही ठरली होती. आताही दरडग्रस्त झालेल्या साखर सुतारवाडी आणि देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे गावातील पुनर्वसनाला आगामी रायगड जिल्हा परिषद आणि पोलादपूर पंचायत समितीच्या निवडणुककामांचा राजकीय खोडा बसण्याची चिन्हे दिसून येत असून कोतवाल कोंढवीमध्ये विरोधी पक्ष जसे विधायक विरोध करण्यास तत्पर होते तसा विरोधच शिल्लक नसल्याने सोशल ऑडिटींग द्वारे या पुनर्वसन कामावर बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे.

९८ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक

दै.रायगड नगरी । पनवेल

फ्लॅट भाड्याने घेतो असे सांगून त्याद्वारे ९८ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली आहे. कामोठे पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामोठे, सेक्टर २१ येथील सहीकत कुंडू यांना तळोजा एमआयडीसी येथील फ्लॅट भाड्याने द्यायचा होता. यासाठी त्यांनी एका वेबसाईटवर जाहिरात दिली. त्यानंतर त्यांना आर्मी ऑफिसर बोलत असल्याचा फोन आला.

यावेळी फ्लॅट भाड्याने घ्यायचा आहे असे सांगून क्यू आर कोड पाठवतो तो स्कॅन करा त्यानंतर पेमेंट येईल असे समोरील व्यक्तीने कुंडू यांना सांगितले. मात्र तो क्यू आर कोड स्कॅन केला असता अकाउंटमधून पैसे वजा झाले. त्यानंतर पैसे परत येतील त्यासाठी पुन्हा क्यू आर कोड स्कॅन करा असे सांगण्यात आले. यावेळी त्यांच्या खात्यातून एकूण ९८ हजार रुपये वजा झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

तळोजा फेज-२ वसाहत खड्डेमय; सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष

दै.रायगड नगरी । पनवेल

तळोजा फेज-२ वसाहत मधील रस्त्यांवर सर्वत्र खड्डे पडले असून, रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहन अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असतानाही रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याकडे सिडको प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे रस्त्यांवरील खड्ड्यात एखाद्या निष्पापाचा बळी गेल्यानंतरच रस्ते चांगले होणार काय?, असा प्रश्न तळोजा फेज-२ वसाहत मधील नागरिक उपस्थित करु लागले आहेत.

पेंधर रेल्वे फाटक आणि तळोजा फेज-१ येथील नानासाहेब धर्माधिकारी पूल ओलांडून तळोजा फेज-२ वसाहतीत प्रवेश करताच नागरिकांचे खड्ड्यांनी स्वागत होते. तळोजा फेज-२ मध्ये पावसाळ्यात खड्ड्ययांची समस्या कायमच उद्भवत असते. रस्त्यांवरील खड्ड्यांचा नाहक त्रास वाहन चालकांना सहन करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवरील खड्डे वाहन अपघाताला आमंत्रण देत असूनही खड्डे वेळेत बुजवण्यात येत नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. तळोजा सेक्टर-१८ मधील अष्टविनायक रिव्हर साईड इमारती कडून, तळोजा सेक्टर- १९ नेक्सस हाईट्स कडून तळोजा सेक्टर-२० कडे जाणाऱ्या रोशनी इमारत या मुख्य रस्त्यावर एक ते दीड फुटाचे खोल खड्डे पडले आहेत. तळोजा सेक्टर-२० मधील फ्लोरा सोसायटी समोरील रस्त्यावर पडलेल्या खोल खड्ड्यात दुचाकी चालक आणि वयोवृध्द वाटसरू पडून जखमी झाल्याचे येथील रहिवाशांनी सांगितले. तळोजा सेक्टर-१८ मधील क्लासिक टॉवर, वसानी हेरिटेज समोरुन पेंधर रेल्वे स्थानकाकडे जाणारा रस्ता खड्डेमय बनला आहे. तळोजा सेक्टर- २३ मधील दिशा हाईट्स, पाचनंद कॉम्प्लेक्स, अष्टविनायक हाईट्स, शेल्टर कॉर्नर, गोल्डन हाईट्स, प्रथमेश होम, पार्वती अव्हेन्यू इमारतीकडून नवीन सिडको गृहप्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खड्डे पडले असून, पदपथावरील झाकण गायब झाली आहेत. तळोजा सेक्टर-२४ ते सेक्टर-२७ मधील रस्त्यावर देखील खड्डे पडले आहेत. तळोजा सेक्टर-१६ मधील स्काय लाईन इमारती कडून घोटगाव तर तळोजा सेक्टर-२६ मधील रॉयल हायात इमारतीकडून तळोजा सेक्टर-२४ मधील मंगला रेसिडेन्सी इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. गंभीर बाब म्हणजे खड्डेमय रस्त्यावरुन जाताना दुचाकीस्वारांची तारांबळ उडत आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहन अपघात घडण्याची शक्यता असतानाही सिडको प्रशासन रस्त्यांवरील खड्ड्यांकडे दुर्लक्ष करीत आहे. दरम्यान, तळोजा फेज-२ वसाहत मधील रस्ते दुरुस्त करण्याच्या कामाची निविदा काढण्यात येणार असून, लवकरच सर्व खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती केली जाणार आहे, असे कळंबोली येथील सिडको कार्यालयातून सांगण्यात आले.

तळोजा फेज-२ वसाहत मधील रस्त्यांवर एक ते दीड फूट खोल खड्डे पडले आहेत. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून, किरकोळ अपघातांच्या घटनेत वाढ होत आहे. 'सिडको'ने खड्डेमय रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे काम तातडीने करण्याची गरज आहे.

- महेश भोईर, शिवसेना
तळोजा उपशहरप्रमुख

देशातील महागाई व शेतकरी विरोधी काळे कायदे रद्द करण्यासाठी खोपोलीत आंदोलन

दै.रायगड नगरी । खोपोली

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्ष सोनिया गांधी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आदेशानुसार वाढत्या महागाई डिझेल, पेट्रोल दर वाढ तीन शेतकरी विरोधी काळे कायदे रद्द करण्याच्या मागणीसाठी व शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी खोपोली शहर काँग्रेस खालापूर तालुक्याच्या वतीने २७ सप्टेंबर खोपोली शीळफाटा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समोर काँग्रेसतर्फे आंदोलन करीत भाजप सरकारचा निषेध व्यक्त करीत भाजपा सरकार व पंतप्रधान नरेंद्र मोदी व विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात घोषणाबाजी करण्यात आली असून यावेळी काँग्रेसच्या वतीने खालापूर तसिलदार यांना निवेदन देण्यात आले.

केंद्र सरकारने वाढवलेल्या घरगुती गॅस.पेट्रोल. डिझेल महागाईविरोधात खालापूर तालुका व खोपोली शहर काँग्रेस कार्यकर्त्यांनी खोपोली शीळफाटा परिसरात २७ सप्टेंबर रोजी केंद्र सरकार विरोधात निदर्शने करीत केंद्र सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी व विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात जोरदार घोषणा देण्यात आल्या असून देशातील शेतकरी व जनतेला भूलथापा देऊन सत्तेवर आलेल्या

केंद्र सरकारने दरवाढ मागे घ्यावी अशी मागणी आंदोलकांनी केली.

तर पेट्रोल च्या दराने केव्हाच शंभरी पार केले असून डिझेल याच बरोबर घरगुती गॅस. तेलाचे भाव गगनाला भिडल्याने या महागाई सर्वसामान्याचे आर्थिक बजेट डगमगल्याचे पहायला मिळत असताना कोरोनाच्या भयानक परिस्थितीत गेल्या दोन वर्षापासून सर्वसामान्य नागरिक दरवाढीने भरडला गेला आहे बेरोजगार शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला आहे. येत्या काही दिवसात आणखी किती दर वाढणार याचा अंदाज घेणे कठीण आहे असल्याने केंद्र सरकारच्या मनमानी कारभारचा अनेक जण निषेध व्यक्त करीत असताना खालापूर तालुका काँग्रेस व खोपोली शहर काँग्रेस च्या वतीने केंद्र सरकार चा निषेध करण्यात आला असून केंद्र सरकार विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी खोपोली शहर काँग्रेस अध्यक्ष रिचड जॉन, युवक अध्यक्ष संदेश धावारे, तालुका अध्यक्ष नाना म्हात्रे, ज्येष्ठ नेते कृष्णा पारंगे, सरचिटणीस रायगड जिल्हा काँग्रेस अशोक मुंढे, शीळफाटा विभाग अध्यक्ष मेहबूब शेख, हैदर फक्की, प्रवीण वेदक, जलील कुरेशी, इरफान शेख, सागर सुखदरे, कुणाल जाधव, श्याम बिनोरकर आदीप्रमुखसह मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

पालीत माकडे आणि वानरांचा उच्छाद वाढला ; नागरिक हैराण

कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

प्रसिद्ध अष्टविनायक क्षेत्र असलेल्या पाली गावात माकड व वानरांनी उच्छाद दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यांच्या उपद्रवामुळे नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत. मालमत्तेच्या नुकसानीबरोबरच काही लोकांवर देखील या माकडांनी हल्ले करून जखमी केले आहे. त्यामुळे या वानर व माकडांचा कायम स्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी वनविभाग व तालुका प्रशासनाकडे सुज्ञ नागरिकांनी केली आहे.

पाली मधील राम आळी, बाजारपेठ, देऊळवाडा, मधली आळी, खडकाळी, कासार आळी, सोनार आळी, आगर आळी, बेगरआळी, उंबरवाडी, सावंत आळी, अशा सर्वच गजबजलेल्या भागात माकडे आणि वानरे रोज धुमाकूळ घालत आहेत. मोठमोठी वानरे आणि माकडे छतावर उड्या मारून घराचे पत्रे व कौले फोडतात. तसेच ड्रेनेजचे पाईप, विजेच्या तारा, गच्चीत ठेवलेले सामान, पाण्याच्या टाक्या, झाडाच्या कुंड्या, झाडे यांचे अतोनात नुकसान करत आहेत. त्यांच्या या उपद्रवामुळे झाडे, फळे, फुले यांचे नुकसान होत आहे. बाहेर कोणत्याही गोष्टींचे वाळवण घालता येत नाही. इतकेच नव्हे तर घराची दारे, खिडक्या पण उघड्या ठेवणे अवघड झाले. घरात शिरून माकडे अन्नधान्य, भाजीपाला यांची नासाडी करत आहेत. वाळत घातलेले कपडे देखील फाडून टाकतात. यामुळे मोठी आर्थिक हानी होत आहे.

एक ते दीड महिन्यांपूर्वी येथील राम आळीमध्ये विजेचा धक्का लागून आठवडाभराच्या अंतराने २ वानरांचा मृत्यू झाला होता. तसेच गावात बिनदिक्कत फिरणाऱ्या या वानर व माकडांना वाहनांची ठोकर लागण्याचा देखील धोका आहे.

एटीएम कार्डची अदलाबदल करुन फसवणूक करणाऱ्या चोरट्याला तिघा मजुरांनी पकडले

दै.रायगड नगरी । पनवेल

एटीएम कार्ड ची अदलाबदल करून एटीएम कार्ड धारकांच्या खात्यातून परस्पर रक्कम काढणाऱ्या चोरट्याला तीन मजुरांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना घणसोलीत घडली आहे. दिपक इंद्रभुषण उर्फ बिपीन झा (२८) असे या चोरट्याचे नाव असून रबाळे पोलिसांनी त्याला अटक करुन त्याची चौकशी सुरु केली आहे. या चोरट्याच्या अटकेमुळे एटीएमच्या फसवणुकीचे अनेक गुन्हे उघडकिस येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

घणसोलीतील रिलायन्स जिओ कंपनीत इमारतीच्या बांधकाम साईटवर काम करणारे मजूर चंद्रेश कुमार, शेशमन राव, अनिश कुमार राव हे तिघेही मूळचे उत्तर प्रदेश राज्यातील असून गत गुरुवारी हे तिघेही दैनंदिन जिवनावश्यक वस्तु खरेदी करण्यासाठी घणसोलीत गेले होते. यावेळी तिघेही घणसोली गाव येथील युनियन बँकेच्या एटीएम सेंटरवर पैसे काढण्यासाठी गेले असताना, चंद्रेश कुमार व अनिशकुमार हे दोघे एटीएममध्ये गेले होते, तर शेशमन राव हा बाहेर थांबला होता. याचवेळी आरोपी दिपक इंद्रभुषण उर्फ बिपीन झा हा सदर एटीएममध्ये घुसला. त्यानंतर त्याने बँकेचा कर्मचारी असल्याचे व एटीएम मशीनमध्ये पैसे टाकायचे असल्याचे सांगून त्यांना लवकर पैसे काढण्यास सांगितले. यावेळी चंद्रेश एटीएम मधून पैसे काढत असताना, चोरटया बिपीन झा याने त्याच्या एटीएमचे पासवर्ड चोरुन पाहुन घेतले.

त्यानंतर त्याने चंद्रेशला मदत करण्याच्या बहाण्याने त्याच्याजवळ असलेले एटीएम कार्ड घेऊन त्या बदल्यात त्याला दुसरे एटीएम कार्ड देऊन त्याठिकाणावरुन पळ काढला. त्यानंतर चंद्रेशने सदर कार्डचा वापर करुन पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यातून पैसे येत नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी एटीएम कार्डची तपासणी केली असता, सदर कार्ड बदलण्यात आल्याचे त्याच्या लक्षात आले. बँकेचा कर्मचारी असल्याचे सांगून एटीएममध्ये आलेल्या व्यक्तीनेच सदरचे कार्ड बदलल्याचे लक्षात आल्यानंतर चंद्रेश व त्याच्या दोघा मित्रांनी तात्काळ सदर चोरट्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली.

त्या भागातील काही लोकांनी दिलेल्या माहितीनुसार या तिघांनी मोटारसायकलवरुन चोरटया बिपीन झा याचा शोध घेतला असता, सदर चोरटा हा घणसोली सेक्टर-२३ मधील क्रिकेट मैदानाजवळ सापडला. त्यानंतर चंद्रेश व त्याच्या मित्रांनी चोरटया बिपीन झा याला पकडून त्याची तपासणी केली असता, त्याच्याजवळ चंद्रेशच्या एटीएम कार्डसोबतच इतर अनेक डुप्लिकेट एटीएम कार्ड आढळुन आले. त्यामुळे या तिघांनी त्याला रबाळे पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानंतर रबाळे पोलिसांनी सदर चोरटयाला अटक केली.